सं. फौ.ख.क्रं. ४७७/२०२१
शासन वि. विकास
नि.क्र. ३२

## सरकारतर्फे साक्षीदार क्रं.०३ यांची शपथेवर जबानी

| | | |
|---|---|---|
| नाव | : | सुर्यभान एकनाथ गोल्हार |
| वय | : | ५८ वर्षे |
| व्यवसाय | : | शेती |
| राहणार | : | कापसी, ता.आष्टी, जि.बीड. |

## सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्री.व्ही.एस.गव्हाळे यांचेमार्फत शपथेवर सुरु

१. घटना दि. ०६/०१/२०२१ रोजी घडली. नातेवाईकाच्या लग्नासाठी पाथर्डी येथे मी, फिर्यादी, बबईबाई व मयत माझे वडील एकनाथ जात होतो. फिर्यादी व वडील पुढे काळ्या रंगाच्या दुचाकी मोटारसायकलवर गेले. १५ मिनीटांनी मी बबईबाई सोबत निघालो. धामणगावच्या जवळ खिळद शिवारात लोकांची गर्दी दिसली. तेथे पाहिले असता, फिर्यादी व वडीलांचा अपघात झाला होता. वडीलांचा पाय साईटला झाला होता, आतडे बाहेर निघाले होते. वडीलांचे पायाचे हाड १५ फुटावर पडले होते. फिर्यादी रामकिसनला हाताला व पायाला लागले होते. दुचाकी गाडी समोरुन धडकुन तुटली होती. लाल रंगाची अल्टो गाडीवर मोटारसायकलवर हाताचे ब्रेकची वायर पडली होती. त्यानंतर मी गावाकडुन गाडी बोलावुन फिर्यादीस दवाखान्यात नेले. वडीलांना धामणगाव येथे मी सरकारी दवाखान्यात घेऊन आलो. तेथे डॉक्टरांनी वडीलांना मयत घोषित केले. त्यानंतर शवविच्छेदन करुन गावाकडे आणुन अंत्यविधी केला. फिर्यादीस २-४ दिवसांनंतर नगरला उपचारासाठी दाखल केले. फिर्यादी घटनेनंतर बेशुध्द असल्याने अपघाताबाबत सांगता आले नाही. फिर्यादी ५-६ दिवसानंतर शुध्दीवर आला. फिर्यादीने गाडी समोरासमोर धडकलेबाबत, लाल रंगाची गाडी समोरुन आमच्या गाडीवर येऊन धडकलेबाबत सांगितले. अल्टो गाडी कोण चालवत होते याबाबत कळाले नाही. घटनेबाबत पोलीसांनी चौकशी करुन माझा जबाब नोंदवला. दोन्ही गाड्या पाहिल्यास ओळखु शकतो.

**सरतपास पुर्ण**

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री आर.बी. मुटकुळे यांचेमार्फत**

२. हे म्हणणे खरे आहे की, नातेवाईकाचे लग्न असल्याने घाई-गरबडीने चाललो होतो. अपघातग्रस्त मोटारसायकल मयत वडील एकनाथ चालवत होते. वडीलांकडे वाहन चालक परवाना असलेबाबत माहिती नाही. वडीलांचे वय साधारण ८५ च्या पुढे होते. हे म्हणणे खरे आहे की,

त्यामुळे त्यांना गाडी नीट चालवता येत नव्हती. कापसी ते पाथर्डी ४०–५० कि.मी. अंतरावर आहे. कापसी ते खिळद फाटा १० कि.मी. अंतर आहे. लग्न १०.३० वाजताचे होते त्यामुळे घाई झाली होती. घटनास्थळाचा रस्ता ४० फुट रुंदीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्याला चढ–उतार आहे व रस्ता काही ठिकाणी खराब झाला आहे. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही मागुन गेल्यामुळे नक्की अपघात कसा झाला याबाबत माहिती नाही. रस्त्याच्या दोन्ही बाजुला साईट पट्टया आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मोटार सायकल रस्त्याच्या खाली पडली होती. अमान्य की, घाईगरबडीमुळे गाडी रस्त्याच्या खाली पडली. हे म्हणणे खरे आहे की, अपघात विम्यासाठी दावा केलेला आहे. दाव्यासाठी गुन्ह्याबाबत पोलीस कागदपत्रे लागतात.

३. साक्षीदारास अपघात विमा मिळण्यासाठी खोटा गुन्हा दाखल केला असा प्रश्न विचारले असता, साक्षीदाराने उत्तर दिले नाही. घटनेनंतर १० मिनीटांनी मयतास सरकारी दवाखान्यात घेऊन गेलो. त्याचवेळेस फिर्यादीस देखील दवाखान्यात नेले. हे म्हणणे खरे आहे की, पंच शिवाजी नाकाडे हे आमच्या भागातील पुढारी आहेत व त्यांच्याशी चांगले संबंध आहेत. ते हातोला गावचे आहेत. हातोला ते घटनास्थळ १५ कि.मी. अंतर आहे. घटनास्थळाच्या दक्षिणेस १०–१५ वस्त्या आहेत. २० लोक जमा झाले होते. पंच शिवाजी हा धामणगावला जात होता, त्यास कोणी बोलावले नव्हते. घटनेनंतर पोलीस चौकशीसाठी ७–८ दिवसांनी आले. पंचनामा माझ्यासमक्ष केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, नुकसान भरपाई मिळावी म्हणुन मी साक्ष देत आहे. अमान्य की, आरोपीचा घटनेशी संबंध नाही. चढ–उतार असल्याने वाहने सावकाश चालावे लागतात. हे म्हणणे खरे आहे की, रस्ता रहदारीचा आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजुला ढाबे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी रस्त्याला पश्चिमेस उतार व पुर्वेस चढ होता. अमान्य की, फिर्यादीच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

दि.१५.०१.२०२६

श्रवणोत्तर स्वीकृती

MAHESH RAMCHANDRA BADAKH

Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2026.01.15 17:45:45 +0530

श्री. एम. आर.बडाख

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, न्यायालय क्रं.३ आष्टी

**सं. फौ.ख.क्रं. ४७७/२०२१**
**शासन वि. विकास**
**नि.क्र. ३०**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रं.०२ यांची शपथेवर जबानी</u>**

| | | |
|---|---|---|
| नाव | : | यमाजी दशरथ खंडागळे |
| वय | : | ४६ वर्षे |
| व्यवसाय | : | शेती |
| राहणार | : | कापसी, ता.आष्टी, जि.बीड. |

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्री.व्ही.एस.गव्हाळे यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>**

१. पंचनाम्यासाठी मला सुर्यभान गोल्हार यांनी बोलावले होते. त्यांच्यासोबत दुसरे पंच शिवाजी नाकाडे, अंभोरा पोलीस स्टेशनचे राठोड पोलीस हजर होते. पंचनाम्या खिळद फाट्याजवळ बोलावले होते. पोलीसांनी घटनेबाबत माहिती सांगितली व पंच म्हणुन काम करण्यास सांगितले. घटनास्थळ पोलीसांनी दाखवले. घटनास्थळ नगर–बीड रोडला खिळद शिवारात होते. घटनास्थळावर एक स्लेंडर काळ्या रंगाची मोटारसायकल क्र. एम.एच. १६ ए.यु. ३४१९ व अल्टो गाडी क्र. एम.एच. ०६ ए.एफ. २१९८ लाल रंगाची होती. पुढच्या बाजुने मोटारसायकल तुटलेली होती. अल्टो गाडीची समोरच्या बाजुची काच व लाईट तुटली होती. मोटारसायकलचे हातातील ब्रेक लिव्हर तुटुन ती अल्टो गाडीवर लटकले होते. तेथे एक मयत इसम पडलेला होता. तेथे फिर्यादी रामकृष्ण देखील पडलेला होता त्याचे आजोबाच्या पायाचा तुकडा ५० फुट अंतरावर तुटुन पडलेला होता. घटनास्थळी रक्त पडलेले होते.

२. घटनास्थळाच्या चतुःसिमा पुर्वेस बीड–नगर हायवे धामणगावकडे जाणारा, पश्चिमेस नगर–बीड हायवे डोईठाणकडे जाणारा, दक्षिणेस बाळासाहेब गर्जे यांची जमीन व उत्तरेस सिताराम गर्जे यांची शेतजमीन आहे. पोलीसांनी घटनास्थळाचे फोटो व शुटींग माझ्यासमक्ष काढली. ते पाहिल्यास ओळखु शकतो. पोलीसांनी वाहने जप्त केले. पंचनामा दि. ०६/०१/२०२१ रोजी दुपारी २.०० ते ४.०० वाजण्याच्या दरम्यान झाला. पोलीसांनी आमच्यासमक्ष पंचनामा करुन त्यावर सह्या घेतल्या. आता मला पंचनामा दाखविण्यात आला. त्यांतील मजकूर खरा व बरोबर असुन त्यावर अनुक्रमांक २ माझी सही आहे. पंचनाम्यास **नि.क्र. पी ३१/ पी.डब्ल्यु २** देण्यात येते. पंचनाम्यातील नकाशा माझ्यासमक्ष काढला. जप्त वाहने पाहिल्यास ओळखु शकतो.

**सरतपास पुर्ण**

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री आर.बी. मुटकुळे यांचेमार्फत**

३.     माझे कापसी गाव आहे. साक्षीदार यादीतील रामकृष्ण, सुर्यभान, अंबादास व बबईबाई हे माझ्या गावातील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पंच शिवाजी नाकाडे पुढारी आहेत. कापसी गावाच्या पुढे त्यांचा ढाबा आहे. त्यांचे आमच्या गावातुन येणे–जाणे होते. काही ठिकाणी भांडणे झाल्यास शिवाजी नाकाडे मदतीसाठी येतो. घटनास्थळ ते माझे गाव १५ कि.मी. अंतर आहे. मी घटनेदिवशी डोईठाण येथे होतो. मला तरटे नावाच्या व्यक्तीचा फोन आला व त्याने अपघाताबाबत सांगितल्याने मी तेथे गेलो. फोनवर मला पंचनाम्यासाठी सांगितले नव्हते. पंच होण्यासाठी मला सुर्यभान गोल्हारने सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, गावातील असल्याने त्यांच्याशी माझे चांगले संबंध आहेत. घटनेबाबत मला १०.०० वाजण्याच्या सुमारास फोन आला. माझ्यासोबत बाळासाहेब गर्जे होता. घटनास्थळी गेलो तेव्हा पंच शिवाजी नाकाडे हजर नव्हता. तेथे ४ पोलीस हजर होते. पोलीस राठोड व्यतिरिक्त इतर पोलीसांची नावे माहिती नाही. मी तेथे १०.१५ वाजण्याच्या सुमारास पोहचलो. घटनास्थळावरुन खिळद फाटा २ कि.मी. अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाचा रस्ता चढ–उताराचा आहे. रस्त्यावर १०–२० फुटाचे चढ–उतार आहेत. रस्ता दोनपदरी आहे. रस्त्याची रुंदी सांगता येत नाही. रस्त्याला दोन्ही बाजुने ५–६ फुटाचे साईटपट्ट्या आहेत.

४.     मोटारसायकल रस्त्यापासुन २ फुट अंतरावर पडली होती. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी लिहला व मी सही केली. अमान्य की, मजकुर वाचला नाही. अमान्य की, पोलीस स्टेशनला पंचनाम्यावर सही केली. अमान्य की, फिर्यादीच्या सांगण्यावरुन साक्षकामी आलो. अमान्य की, माझ्यासमक्ष पंचनामा झाला नाही. अमान्य की, घटनास्थळाच्या पुर्वेस चढ व पश्चिमेस उतार आहे व घटनास्थळाच्या पश्चिमेस लागुन पुल आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी रस्त्याला फाटे आहेत व प्रत्येक फाट्याजवळ ४–५ लोक वस्त्या आहेत. घटनास्थळाच्या १ कि.मी. अंतरावर मंगल कार्यालय व ढाबा आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या पश्चिम बाजुला दोन हॉटेल आहेत. अमान्य की, फिर्यादीच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण– फेरतपास नाही.**

दि.१५.०१.२०२६

श्रवणोत्तर स्वीकृती

MAHESH RAMCHANDRA BADAKH

Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2026.01.15 17:45:36 +0530

श्री. एम. आर.बडाख

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, न्यायालय क्रं.३ आष्टी